# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय परभणी

**(गृह शाखा- कायदा व सुव्यवस्था)**

Email- rdcparbhani@gmail.com Phone- 02452-223702

---

जा.क्र.2023/गृह/पोल-1/पो.पा.भ/कावी दिनांक .12.2023

प्रति,

**उपविभागीय दंडाधिकारी,**

**परभणी/गंगाखेड/पाथरी/सेलू.**

**विषय- पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरणे बाबत,**

संदर्भः-1. गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी-1107/प्र.क्र-515/पोल-8 दि.16.10.2008

2. गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी-0611/प्र.क्र-419/पोल-8 दि. 23.08.2011
3. गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी-0613/प्र.क्र-312/पोल-8 दि.27.08.2014
4. मा.महसूल मंत्री यांचे अ.शा.प.क्र.मंत्री/व्हीआयपी/म.प.दु.वि.742 दि. 23.12.2022
5. मा.उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.2022/सा.प्र./कक्ष-1/पोल-1/शासन पत्र/कावी-2533 दिनांक 26.12.2022
6. या कार्यालयाचे पत्र दिनांक 29.11.2023
7. उप वि.अ.,पाथरी यांचे पत्र क्र 2021/आस्था/पोपा/भरती दि.29.11.2023
8. उप वि.अ.,परभणी यांचे पत्र क्र.2023/पो.पा/आस्था दिनांक 30.11.2023
9. उप वि.अ.,सेलू यांचे पत्र क्र.2023/पो.पा/कावी दिनांक 30.11.2023
10. उप वि.अ.,गंगाखेड यांचे पत्र क्र2023/आस्था/पो.पा./सिआर-2127 दि.04.12.2023
11. मा.जिल्हादंडाधिकारी, परभणी यांची मान्यता दिनांक 07.12.2023

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक 1 अन्वये पोलीस पाटील पदांसाठी प्रवर्ग निहाय आरक्षण व महिला आरक्षण या बाबत सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ क्रमांक 2 अन्वये पोलीस पाटील पद भरतीसाठी लेखी व तोंडी परीक्षा बाबत सविस्तर सुचना देण्यात आलेल्या असून यामध्ये लेखी परीक्षा 80 गुणाची व तोंडी परीक्षा 20 गुणाची घेण्यात यावी असे नमुद आहे. तसेच 20 गुणांची तोंडी परीक्षा घेण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती असेल -

| | |
|---|---|
| उपविभागीय दंडाधिकारी - | अध्यक्ष |
| उपविभागीय पोलिस अधिकारी - | सदस्य |
| समाजकल्याण अधिकारी - | सदस्य |
| आदिवासी प्रकल्प अधिकारी - | सदस्य |
| संबंधित तालुक्याचे तहसिलदार - | सदस्य-सचिव |

संदर्भ क्रमांक 3 अन्वये पोलीस पाटील भरती करीता 80 गुणांच्या लेखी परीक्षेच्या नियोजना करीता समिती गठीत करण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे आहे.

उपविभागीय दंडाधिकारी - अध्यक्ष

उपविभागीय पोलिस अधिकारी - सदस्य

संबंधित तालुक्याचे तहसिलदार - सदस्य-सचिव

उपरोक्त समितीने लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षेचे आयोजन करणे व परीक्षा घेवून प्रश्न पत्रिका तपासून निकाल तयार करणे बाबत शासन निर्णयात तरतूद आहे.

संदर्भ क्रमांक 4 व 5 अन्वये पोलीस पाटील पद भरतीची प्रक्रिया तात्काळ राबविणे बाबत सुचना आहेत. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ क्रमांक 6 नुसार आपणास प्रवर्ग निहाय आरक्षण तसेच महिला आरक्षण बाबतची माहिती सादर करण्यास कळविले होते.

संदर्भ क्रमांक 7 ते 10 नुसार आपण प्रवर्ग निहाय आरक्षण व महिला आरक्षणाची माहिती या कार्यालयास सादर केली आहे.

परभणी जिल्हयातील उपविभाग निहाय रिक्त असलेल्या 305 पोलीस पाटील पदाचे प्रवर्ग निहाय आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| **उप विभाग** | **अनु.जा** | **अनु.ज** | **वि.जा (अ)** | **भ.ज (ब)** | **भ.ज (क)** | **भ.ज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **आ.दु.घ** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परभणी | 7 | 4 | 1 | 2 | 1 | 3 | 2 | 9 | 6 | 20 | 55 |
| गंगाखेड | 17 | 6 | 0 | 3 | 3 | 0 | 5 | 22 | 9 | 25 | 90 |
| पाथरी | 5 | 10 | 2 | - | 3 | 2 | 3 | 11 | 5 | 13 | 54 |
| सेलू | 15 | 10 | 1 | 5 | 4 | 2 | 4 | 28 | 11 | 26 | 106 |
| **एकुण** | **44** | **30** | **04** | **10** | **11** | **07** | **14** | **70** | **31** | **84** | **305** |

तसेच आपण आपल्या उपविभागाचे महिला आरक्षणबाबत खालील प्रमाणे माहिती सादर केली आहे.

**उपविभाग- परभणी**

| **सामाजिक प्रवर्ग** | **अजा 13%** | **अज 7%** | **विजाअ 3%** | **भजब 2.5%** | **भजक 3.5%** | **भजड 2%** | **विमाप्र 2%** | **इमाव 19%** | **आदुघ 10%** | **अराखवी 38%** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भरावयाची पदे** | 7 | 4 | 1 | 2 | 1 | 3 | 2 | 9 | 6 | 20 | 55 |
| **महिला** 30% | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 3 | 2 | 6 | 17 |
| **सर्वसाधारण** | 5 | 3 | 1 | 1 | 1 | 2 | 1 | 6 | 4 | 14 | 38 |

उपविभाग- गंगाखेड

| **सामाजिक प्रवर्ग** | **अजा 13%** | **अज 7%** | **विजाअ 3%** | **भजब 2.5%** | **भजक 3.5%** | **भजड 2%** | **विमाप्र 2%** | **इमाव 19%** | **आदुघ 10%** | **अराखवी 38%** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भरावयाची पदे** | 17 | 6 | 0 | 3 | 3 | 0 | 5 | 22 | 9 | 25 | 90 |
| **महिला** 30% | 5 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 7 | 3 | 7 | 27 |
| **सर्वसाधारण** | 12 | 4 | 0 | 2 | 2 | 0 | 4 | 15 | 6 | 18 | 63 |

उपविभाग- पाथरी

| सामाजिक प्रवर्ग | अजा 13% | अज 7% | विजाअ 3% | भजब 2.5% | भजक 3.5% | भजड 2% | विमाप्र 2% | इमाव 19% | आदुघ 10% | अराखवी 38% | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | 5 | 10 | 2 | 0 | 3 | 2 | 3 | 11 | 5 | 13 | 54 |
| महिला 30% | 1 | 3 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 4 | 16 |
| सर्वसाधारण | 4 | 7 | 1 | 0 | 2 | 1 | 2 | 8 | 4 | 9 | 38 |

उपविभाग- सेलू

| सामाजिक प्रवर्ग | अजा 13% | अज 7% | विजाअ 3% | भजब 2.5% | भजक 3.5% | भजड 2% | विमाप्र 2% | इमाव 19% | आदुघ 10% | अराखवी 38% | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | 15 | 10 | 1 | 5 | 4 | 2 | 4 | 28 | 11 | 26 | 106 |
| महिला 30% | 5 | 3 | 0 | 2 | 1 | 1 | 1 | 8 | 3 | 8 | 32 |
| सर्वसाधारण | 10 | 7 | 1 | 3 | 3 | 1 | 3 | 20 | 8 | 18 | 74 |

उपरोक्त प्रमाणे आपण प्रवर्ग निहाय आरक्षण व महिला आरक्षणा बाबतची माहिती सादर केलेली आहे. त्यानुसार पोलीस पाटील पदभरतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.2 व 3 चे शासन निर्णयानुसार आपण आपल्या स्तरावर पोलीस पाटील भरतीचे आयोजन करुन त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास अवगत करावा.

पोलीस पाटील पदभरतीमध्ये जिल्हयात एकसूत्रीपणा असावा या दृष्टीकोनातून महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 चे कलम 3 नुसार प्राप्त अधिकारानुसार पोलीस पाटील पदभरती करीता खालील प्रमाणे वेळापत्रक ठरवून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | भरती प्रक्रियेचे टप्पे | करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी |
|---|---|---|
| 1 | महिला आरक्षण व EWS आरक्षण निश्चित करणे | 20 डिसेंबर 2023 |
| 2 | जाहिरात प्रसिध्द करणे | 27 डिसेंबर 2023 |
| 3 | अर्ज मागविणे | 28 डिसें. 2023 ते 07 जाने. 2024 |
| 4 | अर्जाची छाननी करणे | 08 जाने. ते 12 जाने. 2024 |
| 5 | अर्जदार यांना प्रवेशपत्र पाठविणे | 13 जाने. ते 19 जाने. 2024 |
| 6 | प्रवेशपत्र न मिळालेल्या उमेदवारांना उप विभागीय कार्यालयातून प्रवेशपत्र उपलब्ध करून देणे | 20 जाने. 2024 |
| 7 | लेखी परिक्षा घेणे | 21 जाने. 2024 |
| 8 | उत्तर तालीका प्रसिध्द करणे | 21 जाने. 2024 |
| 9 | प्रश्नपत्रिका व उत्तर तालीके बाबत आक्षेप व हरकती सादर करणे | 22 जाने. 2024 |
| 10 | अंतिम उत्तर तालीका प्रसिध्द करणे | 23 जाने. 2024 सकाळी 10.00 |
| 11 | उपविभाग निहाय निकाल प्रसिध्द करणे | 23 जाने. 2024 सायंकाळी 05.00 |

| | | |
|---|---|---|
| 12 | पात्र उमेदवारांची तोंडी परिक्षा (मूलाखती घेणे व अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे) | 24 जाने. ते 31 जाने. 2024 |
| 13 | पात्र उमेदवारांची नियुक्ती करणे | 1 फेब्रु. 2024 |
| 14 | जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल सादर करणे | 1 फेब्रु. 2024 |

ज्या गावात पोलीस पाटील पद रिक्त आहे, त्या गावातील सरपंच,ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व सदस्य, व प्रतिष्ठीत नागरिकांना बोलावून त्यांच्या समोर प्रवर्ग निहाय आरक्षण कशाप्रकारे काढले ते समजावून सांगावे. प्रवर्ग निहाय आरक्षण काढल्यानंतर महिला आरक्षण जाहीर करावे. वरील संपुर्ण प्रक्रीयेचे व्हीडिओ शुटिंग करावे. त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास ठरवून दिलेल्या तारखेस विनाविलंब सादर करावा.

8/12

(रघुनाथ गावडे,भा.प्र.से)
जिल्हादंडाधिकारी,परभणी

प्रत-

मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.

8/12

(रघुनाथ गावडे,भा.प्र.से)
जिल्हादंडाधिकारी,परभणी